**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. ०१ यांचा उलटतपास प्रतिवादी क्र.२ ते ४ तर्फे शपथेवर विधीज्ञ श्री. एस. पी. कुलकर्णी यांच्यामार्फत–</u>**

१३. माझे शिक्षण बी.कॉम ग्रॅज्युऐशन सन २०१६–२०१७ मध्ये औसा येथील कुमार स्वामी मुक्त विदयापीठ येथे झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे प्राथमिक शाळेचे इयत्ता ३ री पर्यंतचे शिक्षण औसा येथे झाले आहे. माझी जन्म तारिख ०३/०७/१९८६ आहे. आम्ही चौघी बहिणी आहोत. मी सर्वात मोठी आहे. माझ्यानंतर स्वाती, रूपाली, आश्वीनी असे आहेत. सर्वांचे लग्न झाले आहेत. माझे लग्न २००३ साली झाले आहे. भुकंपानंतर मी लातूर येथे राहयला गेले. हे म्हणणे खरे नाही की, मी २००३ सालापासून औसा येथे राहत आहे.

१४. माझे वडीलांना तिन भाऊ आहेत. सर्वांत मोठे माझे वडील त्यानंतर शरण, सचिन व अजय असे आहेत. शरण यांचे कागदोपत्री नाव शिवशरण, सचिन चे कागदोपत्री नाव शिवशंकर आणि अजय चे कागदोपत्री नाव सिध्देश्वर असे आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आजोबानंतर माझे वडील कुटूंबाचे कर्ता म्हणुन काम पाहत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील थोरले असल्याने व त्यांना व्यवहारिक ज्ञान असल्याने ते १९९६ पर्यंत औसा येथे राहत होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर आम्ही १९९६ ला लातूर येथे राहयला गेलो. लातूर येथे आम्ही भाडयाने प्रकाश नगर येथे राहत होतो. नारायण नगर लातूर येथे माझ्या वडीलांनी कधी घर घेतले याची तारिख व वर्ष मला माहिती नाही.

१५. माझे आजोबाचे नाव करबसअप्पा आहे व आजोबाच्या वडीलांचे नाव महालिंगअप्पा असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे खापरपंजोबाचे नाव महालिंगअप्पा असे आहे. माझे पंजोबाचे नाव रूद्राप्पा आहे. हे म्हणणे खरे आहे की, रुद्राप्पा यांनी दोन लग्न केले आहेत. पहिले लग्न शिवम्माबाई व दुसरे लग्न सुलोचनाबाई यांच्यासोबत केले आहे. यापैकी माझी सख्खी पंजी सुलोचनाबाई आहे. हे म्हणणे खरे आहे की, शिवम्माबाई यांना दोन आपत्य एक माझे आजोबा करबसअप्पा व एक त्यांची बहिण सुगलाबाई असे होते.

१६. सुगलाबाई यांना चार मुले व एक मुलगी आहे, त्यांची नावे वसंत, मधुकर, अनिल बाळासाहेब व मुलगी लताबाई असे आहेत किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. लताबाई मयत झाली आहे किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी पंजी सुलोचनाबाई हिला एक मुलगी विमलबाई अशी आहे. हे म्हणणे खरे आहे की, विमलबाई हिला मैंदरगे, ता. अक्कलकोट येथे दिले आहे व तिला तिन मुले आहेत. त्यांची नावे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पंजीचे मुले व आत्त्याची मुले यांना दाव्यामध्ये पक्षकार केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दाव्यामध्ये दाखवलेल्या मिळकतीमध्ये त्यांचाही अधिकार आहे.

१७. माझे चुलते व वडीलांमध्ये औसा येथील मिळकतीच्या वाटण्या सन १९९६ मध्ये झाल्या आहेत. सदर वाटण्या लेखी किंवा तोंडी झाल्या याबद्दल मला माहिती नाही. माझ्या सध्याच्या माहितीप्रमाणे औसा येथील सर्वे क्र. १२ आणि सर्वे क्र. १५ मध्ये आमची

जमिन आहे. सर्वे क्र. १२ मध्ये एकुण २१ एकर जमिन आहे. सर्वे क्र. १५ मध्ये एकत्र कुटूंबाची एकुण किती जमिन होती हे मला माहित नाही. सर्वे क्र. १२ व सर्वे क्र. १५ शिवाय मला आमच्या एकत्र कुटूंबाच्या इतर किती जमिनी आहेत याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे क्र. १२ व १५ मधील जमिनीमध्ये प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचा अधिकार आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, सर्वे क्र. १२ आणि १५ मधील जमिन माझ्या वडीलांना व आजीला तोंडी वाटणीमध्ये देण्यात आली होती. सदर जमिनीशी प्रतिवादी क्र. २ ते ४ यांचा संबंध नाही. प्रतिवादी क्र. २ ते ४ यांचा सदर मिळकतीशी कोणताही संबंध नाही असे मी माझ्या आज्जीकडून मिळालेल्या ऐकिव माहितीवरून सांगत आहे. माझे आजोबा करबसअप्पा १५ सप्टेंबर १९९८ रोजी मयत झाले.

१८. २००३ साली माझे लग्न झाले त्यानंतर मी लातूर येथे माझे सासरी शिवाजी नगर येथे राहयला गेले. सध्या माझ्या कुटूंबामध्ये माझी सासुबाई, माझा मोठा दिर, त्यांची पत्नी, त्यांची दोन मुले, मी, माझे पती व माझी दोन मुले असे राहतो. मला तिन नंदा आहेत. त्यांचे लग्न झालेले आहे. साक्षीदार पुन्हा सांगतात की, माझे मोठे दिर २०२० पासून वेगळीकडे राहतात. हे म्हणणे खरे आहे की, २०२० पर्यंत आम्ही एकत्र राहत होतो. माझ्या आजीचे नाव जयदेवी करबसअप्पा उटगे आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आजीचे कागदोपत्री जयदेवी असेच नाव अभिलेखात नमुद आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, माझ्या आजीचे नाव कागदोपत्री जगदेवी म्हणुन अभिलेखात नमुद आहे. माझ्या आजीचे नाव

त्यांच्या मृत्यू प्रमाणपत्रामध्ये जगदेवी असे नमुद केलेले आहे. त्यांचे मृत्यूपत्र मी याकामी दाखल केलेले आहे. मला आता माझ्या आजीचे यादी नि.क्र. ४ सोबत अ.क्र. ५ वर दाखल केलेले मृत्यू प्रमाणपत्र दाखवले असता त्यामध्ये त्यांचे नाव जयदेवी असे नमुद केलेले आहे. माझ्या आजीचे नाव अभिलेखामध्ये जयदेवी म्हणुन नमुद केलेले आहे किंवा कसे याबाबत मी सांगु शकत नाही.

१९. हे म्हणणे खरे आहे की, सुरूवातीला माझे आजीचे चारही मुले औसा येथे राहत होते त्यापैकी माझे वडील लातूर येथे राहयला गेले व तिन्ही मुले औसा येथेच राहत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. ४ हे अविवाहित आहेत. हे म्हणणे खरे आहे की, औसा येथे दोन घरे बांधलेली आहेत त्यामध्ये प्रतिवादी क्र. २ ते ४ राहतात. हे म्हणणे खरे आहे की, औसा येथील मिळकत माझ्या पंजोबा आणि आजोबा यांच्या नावाने आहेत त्या मिळकती प्रतिवादींच्या नावावर नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, आजपर्यंत या मिळकती प्रतिवादींमध्ये वाटण्या झालेल्या नाहीत.

२०. माझे वडील हयात आहेत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी मिळकतीमध्ये वाटणी मागितली नसल्याने मला माझ्या पंजोबा व आजोबा यांच्या मिळकतीमध्ये वाटणी मागण्याचा अधिकार नाही. मी आजीच्या मिळकतीमध्ये हक्कदार आहे असा वारसा प्रमाणपत्र मी न्यायालयाकडून प्राप्त करण्याकरिता अर्ज दाखल केलेला नाही किंवा तसे प्रमाणपत्र उपलब्ध करून घेतलेले नाही.

२१. मी याकामी माझ्या आजीचे मुळ बक्षीस पत्र, मृत्यू पत्र दाखल केले नाही. मी सदर मुळ बक्षीस पत्र व मृत्यू पत्र पुढील तारखेस दाखल करण्यास तयार आहे.

(साक्षीदार पुढील तारखेस मुळ बक्षीस पत्र व मृत्यू पत्र दाखल करणार असल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.)

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PARVEZ ISHAQUEKHAN MOKASHI
Date: 2025.12.17 12:07:07 +0530

(पी. आय. मोकाशी)

दिनांकः–१६.१२.२०२५ दिवाणी न्यायाधीश,व. स्तर, औसा.